“मराठी प्रायोगिक रंगभूमीच्या बदल्यात स्वरूपाचा चिकित्सक अभ्यास”

(२०१० ते २०२० कालखंडाच्या संदर्भात)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्या शाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच. डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाच्य प्रबंधाचा स्थूल आराखडा

संशोधक

सत्यवान बबन दाढे

(एम. ए. बीएड)

कै. शंकरराव बाजीराव पाटील, माध्येमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. दुष्यंत मनोहार कटारे

(एम. ए. पीएच. डी. नेट)

प्र. प्राचार्य, कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगांव, ता. जि. लातूर

संशोधन केंद्र

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

२०२४

“मराठी प्रायोगिक रंगभूमीच्या बदलत्या स्वरुपाचा चिकित्सक अभ्यास”

(२०१० ते २०२० या कालखंडाच्या संदर्भात)

१. प्रस्तावना

२. संशोधन विषयाचे महत्त्व

३. संशोधन विषय निवडण्यामागील भूमिका

४. विषयाची व्याप्ती व मर्यादा

५. संशोधनाची उद्दिष्टे

६. संशोधनाची पद्धत

७. शोधप्रबंधाची प्रकरणनिहाय मांडणी

- ७.१ प्रस्तावना
- ७.२ मराठी नाटक संकल्पना आणि वाटचाल
- ७.३ प्रायोगिक रंगभूमीची संकल्पना
- ७.४ प्रायोगिक नाटकांचा आशय
- ७.५ प्रायोगिक नाटकांचे बदलते स्वरुप
- ७.६ प्रायोगिक नाटकांचे वाङ्मयीन मूल्यमापन
- ७.७ उपसंहार

८. साधनसूची

९. संदर्भग्रंथसूची

प्रकरण पहिले

उपोद्घात

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधन विषयाचे महत्त्व

१.३ संशोधन विषय निवण्यामागील भूमिका

१.४ विषयाची व्याप्ती व मर्यादा

१.५ संशोधनाची उद्दिष्टे

१.६ संशोधनाची पद्धत

प्रकरण दुसरे

मराठी नाटक संकल्पना आणि वाटचाल

२.१ प्रस्तावना

२.२ नाटक संकल्पना

२.३ नाटकाची व्याख्या

२.४ नाटकाचे प्रकार

२.५ नाटकाचा इतिहास

२.६ नाटकाची बदलते स्वरूप

२.७ समारोप

२.८ निष्कर्ष

२.९ संदर्भ ग्रंथ

प्रकरण तिसरे

प्रायोगिक रंगभूमीची संकल्पना

३.१ प्रस्तावना

३.२ रंगभूमीचा इतिहास

३.३ रंगभूमी संकल्पना

३.४ रंगभूमीचे बदलते स्वरूप

३.५ समारोप

३.६ निष्कर्ष

३.७ संदर्भ ग्रंथ

प्रकरण चौथे

प्रायोगिक नाटकांचा आशय

४.१ प्रस्तावना

४.२ प्रायोगिक नाटकाची संकल्पना

४.३ २०१० नंतरची प्रायोगिक नाटके

४.४ प्रायोगिक नाटकांचा आशय

४.५ समारोप

४.६ निष्कर्ष

४.७ संदर्भ ग्रंथ

प्रकरण पाचवे

प्रायोगिक नाटकांचे बदलते स्वरूप

५.१ प्रस्तावना

५.२ प्रायोगिक नाटकांचा इतिहास

५.३ प्रायोगिक नाटकांचा आशय

५.४ प्रायोगिक नाटकांचा विषय

५.५ प्रायोगिक नाटकांचे बदलते स्वरूप

५.६ प्रायोगिक नाटकांची मत मतांतरे

५.७ प्रायोगिक नाटकांची सद्यस्थिती

५.८ समारोप

५.९ निष्कर्ष

५.१० संदर्भ ग्रंथ

प्रकरण सहावे

प्रायोगिक नाटकाचे वाङ्मयीन मूल्यमापन

६.१ प्रस्तावना

६.२ आशय मांडणी

६.३ निवेदन पद्धती

६.४ संवाद शैली

६.५ पात्र रचना

६.६ वातावरण निर्मिती

६.७ भाषाशैली

६.८ समारोप

६.९ निष्कर्ष

६.१० संदर्भ ग्रंथ

प्रकरण सातवे

उपसंहार

सर्व प्रकरणांचा संक्षिप्त आढावा

परिशिष्टे

साधनसूची, संदर्भग्रंथ

१. प्रस्तावना

मराठी भाषेत विविधांगाने संशोधनाचे कार्य आजवर झालेले आहे, होत आहे आणि होणारही आहे. संशोधनाच्या कार्याने मराठीतील विविध संशोधनक्षेत्रे संपन्न झालेली आहेत. कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र आदी साहित्य प्रकारांच्या संकल्पनांवरही बरीच संशोधनाचे कार्‍य आजवर झालेली आहेत. परंतु मराठी व्यावसायिक रंगभूमी, प्रायोगिक रंगभूमी या अनुषंगाने म्हणावे तेवढे संशोधन झालेले आढळत नाही. ही बाब लक्षात मी माझ्या संशोधनासाठी "२०१० नंतरच्या प्रायोगिक रंगभूमीचे बदलते स्वरुप" हा विषय निवडला आहे.

प्राचीन काळापासून मराठी माणसाचा अनेक वाङ्मय प्रकाराशी संबंध आलेला आहे. यातीलच मराठी नाटक, मराठी रंगभूमी यांच्याशीही तो मनोरंजन

आणि वास्तवतेच्या दृष्टीने जोडला गेला आहे. नाटक हा मानवाच्या मनःपटलावर दृश्य स्वरुपात अनुभव देणारा वाङ्मय प्रकार असून मानवी मनावर त्याचा परिणाम होताना आढळतो. प्राचीन नाटक आणि अलिकडील काळातील नाटक यामध्ये खूप बदल झालेले पहावयास मिळतात. ही बाब महत्त्वाची मानत मी प्रस्तुत विषयाला न्याय देताना मी मराठी नाटक संकल्पना आणि वाटचाल या दृष्टीने अभ्यास करणार आहे. तसेच मराठी प्रायोगिक रंगभूमी आणि २०१० नंतरच्या प्रायोगिक रंगभूमीचे बदलते स्वरुप, नाटकांच्या आशयातील बदल यावरही प्रकाश टाकता येणार आहे.

२. संशोधन विषयाचे महत्त्व

माझे वास्तव्य ग्रामीण भागात असल्याने लहानपणापासूनच नाटकाने माझ्या मनात घर केले होते. कारण ग्रामीण भागातील गावोगावी भरणाऱ्या यात्रांमध्ये गावातील हौसी कलाकार वर्षातून एकदा नाटक बसवून ते यात्रेकरूंसमोर सादर करतात. अशा नाटकातील गमती जमती, ग्रामीण ढंग पाहून शालेय जीवनापासूनच माझ्या मनावर नाटकाने एक वेगळा ठसा उमटविला होता. तसेच शालेय जीवनातही शाळेत बसवलेली वेगवेगळी नाटके पाहून मन हरखून जायचे. त्यामध्ये मी वेगवेगळया भूमिका केल्या आहेत. त्यामुळे मला नाटकाची आवड पूर्वीपासूनच होती. मला नांदेड येथील ‘स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ’ येथून मराठी विषयात संशोधन करण्याची संधी मिळाली. यानंतर मी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. दुष्यंत मनोहर कटारे यांच्याशी चर्चा करून ‘२०१० नंतरच्या प्रायोगिक रंगभूमीचे बदलते स्वरुप’ हा विषय निवडला.

३. संशोधन विषय निवडण्यामागील भूमिका

आदिम अवस्थेतला माणूस आणि जगण्यासाठी त्यानं केलेला निसर्गाशी संघर्ष हीच सर्वात पुरातन आणि सनातन नाट्यमय घटना असावी. सध्या नाटक हा विषय संशोधनाच्या दृष्टिने दुर्लक्षित आहे. प्रायोगिक रंगभूमीचे रूपांतर व्यावसायिक रंगभूमीत झाले. नाटकाला व्यवसायाचे रूप मिळू लागले. जुनी नाटके नव्याने रंगमंचावर येऊ लागली. व्यावसायिक रंगभुमीवर येणारे नाटक वाङ्मयीन गुणवत्ता असलेले असेलच असे नाही. प्रेक्षकांना काय आवडते त्यांची रुची कशात आहे याचा विचार व्यावसायिक रंगभूमीवर प्रामुख्याने केला जातो. जी नाटके गल्लाभरु ठरतील, पेसे मिळवून देऊ शकतील असे व्यापारी दृष्टीकोन नजर समोर ठेवून नाटकाची निवड केली जाते आणि त्याच भूमिकेतून ती रंगभूमीत सादर देखील होतात. व्यावसायिक रंगभूमीवरुन सादर होणाऱ्या नाटकाची वाङ्मयीन गुणवत्ता तपासणे महत्त्वाचे ठरते. २०१० नंतरच्या प्रायोगिक रंगभूमीचा बदलता चेहरा यादृष्टीने तपासणे महत्वाचे ठरणार आहे. ही बाब लक्षात घेता मी या विषयाची निवड संशोधनासाठी केली आहे.

४. विषयाची व्याप्ती व मर्यादा

व्यावसायिक रंगभूमीवरील नाटकांच्या बदलत्या स्वरुपाचा अभ्यास करताना २०१० नंतरच्या कालखंडाचा विचार करण्यात येणार आहे. या कालखंडात रंगमंचावर सादरीकरण झालेल्या नाटकांचा रसिक प्रेक्षकांवर पडलेला प्रभाव व परिणाम तपासता येईल. त्यासाठी प्रायोगिक नाटकांतून सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, विनोदी नाटकांमधून प्राथमिक साधने गोळा करून त्या नाटकांच्या वाङ्मयीन गुणवत्तेची व बदलत्या स्वरुपाची सांगड घालत प्रायोगिक रंगभूमीचे बदलते स्वरुप अभ्यासले जाणार आहे. प्रस्तुत संशोधन

विषयामध्ये मराठी प्रायोगिक रंगभूमीचा अभ्यास करताना विशेषतः २०१० नंतरचा कालखंड डोळयासमोर ठेवत अभ्यास केला जाणार आहे.

५. संशोधनाची उद्दिष्टे

"२०१० नंतरच्या प्रायोगिक रंगभूमीचे बदलते स्वरुप" या संशोधन विषयाअंतर्गत नाटकांचा अभ्यास करीत असताना खालीलप्रमाणे काही उद्दिष्टे डोळयासमोर ठेवण्यात आलेली आहेत.

१. मराठी नाटकाची संकल्पना आणि वाटचालीचा अभ्यास करणे.

२) मराठी नाट्यक्षेत्रातील प्रायोगिक रंगभूमीचा अभ्यास करणे.

३) २०१० नंतरच्या कालखंडात प्रायोगिक रंगभूमीमध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

४) २०१० नंतरच्या प्रायोगिक नाटकांची आशयबिजांचा अभ्यास करणे.

५) प्रायोगिक रंगभूमीच्या वाङ्मयीन गुणवत्ता तपासणे.

६. संशोधन पद्धत

"२०१० नंतरच्या प्रायोगिक रंगभूमीचे बदलते स्वरुप" या प्रस्तुत विषयाचा अभ्यास व संशोधन करताना प्रामुख्याने ऐतिहासिक व समाजशास्त्रीय पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. विविध संदर्भ ग्रंथांच्या आधारे वर्णनात्मक अभ्यास पद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे. मराठी प्रायोगिक नाटकाच्या अनुषंगाने समाजशास्त्रीय, वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

७. शोधप्रबंधाची प्रकरणनिहाय मांडणी

"२०१० नंतरच्या प्रायोगिक रंगभूमीचे बदलते स्वरुप" या संशोधन विषयाला न्याय देण्यासाठी खालील प्रकरणांची मांडणी करण्यात आली आहे.

प्रकरण पहिले - उपोद्घात

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधन विषयाचे महत्त्व

१.३ संशोधन विषय निवण्यामागील भूमिका

१.४ विषयाची व्याप्ती व मर्यादा

१.५ संशोधनाची उद्दिष्टे

१.६ संशोधनाची पद्धत

प्रकरण दुसरे - मराठी नाटक संकल्पना आणि वाटचाल

प्रस्तुत प्रकरणात मराठी नाटकाची संकल्पना आणि वाटचाल या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार आहे. मराठी साहित्य प्रारंभपासूनच वेगवेगळया प्रेरणा आणि प्रवृत्ती घेऊन निर्माण झालेले आढळते. मराठी साहित्यात संत साहित्य, पंडित साहित्य, शाहिरी साहित्य असे मध्ययुगीन काळात वाङमय १९६० नंतर दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, ख्रिस्ती, बालसाहित्य, जनसाहित्य, विज्ञान साहित्य असे वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले आहेत. तसेच मराठी साहित्यप्रकारामध्ये काव्य, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन यांचा अंतर्भाव दिसून येतो. यातील ‘नाटक’ या कला प्रकाराचा मानवी अस्तित्त्वाशी निकटचा संबंध आहे. किंबहुना नाटक हे मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे.

नाट्याविष्काराची परिणामकारकता शेकडो वर्षापासून मानवी मनात रुजत आली आहे. नाट्यकृती केवळ मनोरंजनासाठी असते असं नव्हे तर उद्बोधन ही तिचा उद्देश असतो. ज्या त्या काळातील जीवन जाणिवांची, बदलत्या संदर्भाची कळत नकळत घडत जाणाऱ्या घटणांची अभिव्यक्ती प्रामुख्यानं

नाटकातूनच होत असते. मानवी मनातील आक्रंदन, स्पंदन आणि आंदोलनं वेगवेगळ्या पातळयावर प्रकट होत असतात. इतकी मूल्ययुक्त ताकद नाटकात असते. मानवी भावभावनांचं दृश्य स्वरूपातलं प्रगटीकरण म्हणजे नाटक. कथा, कवितापेक्षा नाटकाचा प्रभाव शतपटीनं अधिक असतो. आत्मसंवाद अभिनयातून अभिव्यक्त होत असतो. म्हणून माणसाचं देहभान हरपून टाकण्याचं सामर्थ्य नाटकात असतं. नाटक हे त्यांच्या अंगभूत शक्तीमुळे दीर्घकाळ लक्षात राहतं. नाट्यपूर्ण अनपेक्षित चमत्कृतीनं प्रेक्षक घायाळ. अभिनेत्यांना घडविण्याची पायाभूतं कार्यशाळा म्हणजे नाटक होय. अशा या मराठी नाटकाची संकल्पना व वाटचाल प्रस्तुत प्रकरणात तपासली जाणार आहे.

प्रकरण तिसरे - प्रायोगिक रंगभूमीची संकल्पना

नाटक हा साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे. साहित्याच्या प्रांतात मराठी नाटकाने आपला एक वेगळा ठसा उमटविला आहे. नाटक हा साहित्यप्रकार दृकश्राव्य असून नाटकाचा प्रेक्षकांवर अभूतपूर्व असा प्रभाव यातून पडताना पहावयास मिळतो. मराठी रंगभूमीचा नाट्यकलेचा इतिहास पाहता रंगभूमीच्या प्रत्येक वळणावर रंगभूमीच्या संकल्पनेत, स्वरुपात बदल होताना दिसतो. विविध नाट्यप्रवाह मराठी रंगभूमीवर निर्माण झाले. हौशी, व्यावसायिक, प्रायोगिक, समांतर, पथनाट्य, दलित, संगीत रंगभूमी असे अनेक प्रवाह रंगभूमीवर स्वतःच अस्तित्व निर्माण करीत स्वतंत्र ओळख देऊ लागले. लोकधर्मी नाट्य ते प्रायोगिक रंगभूमी असा प्रवास रंगभूमी करताना दिसत आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अनेक हौशी नाट्यवेडे प्रेक्षक पहावयास मिळतात. आवर्जून नाटकाचे प्रयोग पाहणारे प्रेक्षक सतत नाविन्याच्या शोधात असतात. यातूनच प्रायोगिक रंगभूमीचा विकास होत गेलेला दिसून येतो.

भारतात भिन्न भाषांतील लोकांसाठी भिन्न मनोरजंनाची साधने वेद काळापासून उपलब्ध असलेली पहावयास मिळतात. लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेल्या लोकनाट्यात लोकांचे आयुष्य, जीवनपद्धती यांच्या बदलाबरोबर मराठी रंगभूमीचे स्वरुपही बदलते आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रायोगिक रंगभूमीची संकल्पना विशद केली जाणार आहे. तसेच प्रायोगिक रंगभूमीचे स्वरुप आणि बदल याविषयी विविध अंगाने अभ्यास करण्यात येणार आहे. प्रायोगिक रंगभूमीच्या उदयाची कारणे, प्रायोगिक रंगभूमीचे महत्त्व, प्रायोगिक रंगभूमीचे विशेष तपासले जाणार आहेत.

प्रकरण चौथे - प्रायोगिक नाटकांचा आशय

मराठी नाटकात 'प्रायोगिक' हा शब्द इंग्रजीतील 'एक्सपीरिमेंटल' या अर्थाने वापरला जातो. म्हणजेच प्रायोगिक रंगभूमी अर्थात 'एक्सपीरिमेटल थिएटर' प्रायोगिक या शब्दात 'प्रयोग' हा शब्द दडलेला आहे. 'प्रयोग' म्हणजे नाटकाच्या संदर्भातील जे 'खेळ' करणे आणि दुसरा अर्थ या खेळात 'नवे' आणि वेगळे शोधणे', शक्यताचा शोध घेणे या अर्थाने वापरला जातो. प्रायोगिकता याची व्याख्या आणि संकल्पना समजावून घेवू प्रायोगिकतेच्या संदर्भात अनेक साहित्यिक, नाट्यसमिक्षिंनी व्याख्या केल्या आहेत. यातील वीणा माळी या आपल्या व्याख्येत लिहितात, "ज्या नाट्यक्तीमधून नाटकांचे 'वाहय' रुप शैलीच्या संदर्भात व 'अतरंग' आशयाच्या संदर्भात बदलत जाउन 'शैली' व 'आशय' हे एकमेकात मिसळून जातात. कारण त्याशिवाय जी नाट्यकृती उभीच गहू शकणार नाही हा 'नवेपणा' म्हणजे प्रायोगिकता होय." तसेच स. शि. भावे या सदंर्भात आपलं मत मांडतांना म्हणतात, "नवे आणि हौशी' म्हणजे 'प्रायोगिक' नव्हे, हे मान्य झाले म्हणजे प्रायोगिक' चा अर्थ सोपेपणाने स्पष्ट होईल.

जाणीवपूर्वक, मनाशी काही हेतू धरुन, नवी वाट चालून पाहणे, अशी प्रायोगिकतेची सुटसुटीत व्याख्या करता येईल” प्रायोगिक रंगभूमीवर हेतूपर्ण ठरवून आशयात व अभिव्यक्तीत प्रयोग करत राहणे म्हणजे प्रायोगिकता असे म्हणता येईल.

प्रस्तुत प्रकरणात २०१० नंतरच्या प्रायोगिक नाटकांच्या आशयाची मांडणी केली जाणार आहे. या कालखंडातील नाटकांचे विषय आणि आशय कोणत्या स्वरुपाचा आहे? प्रेक्षकांनी या नाटकांना कोणत्या प्रकारे प्रतिसाद दिला आहे? नाटकांची गुणवत्ता आणि लोकप्रियता, नाटकांचे विशेष आणि समीक्षकांची मते यादृष्टिने या प्रकरणाला न्याय देण्याचा मानस आहे.

प्रकरण पाचवे - प्रायोगिक नाटकांचे बदलते स्वरुप

१९४६ नंतर मुंबईत माधव मनोहर यांनी नाट्यलेखनात व आत्माराम भेंडे यांनी दिग्दर्शनात प्रयोग केल्याचे दिसून येते. इब्राहीम अल्काझी या प्रतिभावंत दिग्दर्शकाने पाश्चिमात्य नाटकांचे प्रयोग केले ते १९५० साली. १९५०-५१ सालात एकांकिका स्पर्धेला सुरुवात झाली त्यातून विजय तेंडूलकर, रत्नाकर मतकरी, विजया मेहता, दामू केंकरे, अरविंद देशपांडे, माधव वाटवे. कमलाकर सारंग, सुलभा देशपांडे यांनी नवी नाटके लिहिली, दिग्दर्शीत केली. नव्या नाटकांचे, नव्या घडणीचे, बाजाची नाटके रंगभूमीवर येऊ लागली त्याच काळात आलेल ‘श्रीमंत’ हे विजय तेडुलकरांच नाटक. पुरुषोत्तम रेगे यांनी पुस्तकरुपाने प्रकाशित केलेली नाटके प्रायोगिक स्वरुपाचीच होती.

मराठी रंगभूमीला प्रायोगिक रंगभूमीचे स्वरुप प्राप्त होत होते. नाटकाची विशिष्ट नेहमीची चौकट मोडणे, अनुभवातून नाट्याअनुभव उभा करणे आणि सादर करणे, त्याच्या आकृतिबंधात नाविन्य आणणे, आशय आणि अभिव्यक्तीत

स्वातंत्र घेणे, स्थळ, काळ, रचना, नेपथ्य, अभिनय, तंत्र यात जाणीवपूर्वक बदल घडविणे. प्रा. रमेश देशमुख म्हणतात, “नव्या जाणीवेचे लेखक आता नाटकाकडे एका वेगळया दृष्टीने, नव्या दृष्टीने पाहू लागले. रंगभूमीवरचे साचलेपण, तोच तोपणा यांचा त्यांना तिटकारा येऊ लागला. हे साचलेपण दूर सारुन रंगभूमीवर नवता साकार करण्याची त्यांची धडपड सुरु झाली. विविक्षित अनुभवाच्या निमित्ताने जीवनाचा शोध घेण्याचे प्रयत्न त्यांनी आपल्या नाटकातून सुरु केले. मानवी जीवनाचा, या जीवनातील विविध नात्यांचा मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न नाटककार करु लागले. त्यातूनच नाट्यरचने बाबतचे संकेत त्यांनी नाकारावयास सुरुवात केली. प्रतिकात्मकता, अपरिचित सूचकता इत्यादी बाबींचा स्वीकार या नव्या जाणीवेच्या नाटककारांनी करावयास सुरूवात केली.” त्यातून प्रायोगिक नाटक आकारास आलेले पहावयासि मिळते.

प्रस्तुत प्रकरणात प्रायोगिक नाटकांचे बदलते स्वरुप या अनुषंगाने अभ्यासाची मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे - प्रायोगिक नाटकांचे वाङ्मयीन मूल्यमापन

नाटकामध्ये मानवी जीवनाचा कलात्मक आविष्कार घडत असतो. नाटक हे काल्पनिक अथवा वास्तव घटनेवर आधारित असते. नाटक हे मनोरंजनाच्या माध्यमातून उपदेश करत असते. यासंदर्भात गो. वा. बापट म्हणतात की, “कादंबरीप्रमाणेच नाटकालाही संविधानक, पात्रे व क्रिया ही तीन अंगे असून त्याचे स्वरुप बहुतांशी संवादात्मक असते.” नाटकाच्या निर्मितीत संविधान, पात्रप्रसंगाना महत्त्व असते. नाटकातील घटना, घडामोडी, नेपथ्य, वातावरणनिर्मिती, भाषाशैली, संगीत इ. घटकांना महत्त्व असते.

प्रस्तुत प्रकरणात 'प्रायोगिक नाटकांचे वाङ्मयीन मूल्यमापन' या शीर्षकाखाली अभ्यास करण्यात येणार आहे. प्रायोगिक नाटकांचे वाङ्मयीन मूल्यमापन करताना नाटकाचा विषय, नाटकातील पात्रचित्रण, वातावरण-निर्मिती, संवादशैली, निवेदनपद्धती, भाषाशैली या मुद्यांच्याआधारे अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सातवे - उपसंहार

या प्रकरणात वरील सर्व प्रकरणांचा संक्षिप्त आढावा घेण्यात येणार आहे. तसेच संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष नोंदविण्यात येतील.

८. साधनसूची

१) दादरकर अद्वैत, मीटर डाऊन, आंतर नाट्य संस्था, मुंबई.

२) देशपांडे चं.प्र., प्रेमच म्हणू याला हवं तर, मितीचार नाट्य संस्था, मुंबई.

३) देशपांडे चं.प्र. बुध्दीबळ आणि झब्बू, वलय नाट्य मंडळ, पुणे.

४) नाईक राजीव, साठेचं काय करायचं, समन्वय नाट्य संस्था, पुणे.

५) पवार जयंत, काय डेंजर वारा सुटलाय, महाराष्ट्र रंगभूमी, पुणे.

६) पवार संतोष, यदाकदाचित, दत्त विजय प्रॉडक्शन, मुंबई.

७) पाटील जितेंद्र, कबड्डी कबड्डी, सुयोग नाट्य संस्था, मुंबई.

८) पाटोळे अशोक, श्यामची मम्मी, डॉल्फीन एन्टरटेनमेंट, मुंबई.

९) पोत्रेकर किरण, कळा लागल्या याजीवा, श्री चिंतामणी नाट्य संस्था, मुंबई.

१०) फणसळकर चंद्रकांत, खेळी-मेळी, एकदंत क्रिएशन्स, मुंबई.

११) बेर्डे पुरुषोत्तम, सर आले धावून, अष्टविनायक नाट्य संस्था, मुंबई.

१२) बेळे अशोक, नेव्हर माइंड, महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे.

१३) भडकमकर अभिराम, देहभान, दत्तविजय प्रॉडक्शन, मुंबई.

१४) मतकरी रत्नाकर, पाच पांडवांचा बाप, अष्टविनायक नाट्य संस्था, मुंबई.

१५) मनवर सतिश, बारबार, ललित नाट्य संस्था, मुंबई.

१६) मोकाशी परेश, मु.पो. बोंबिलवाडी, अथर्व नाट्य संस्था, मुंबई.

१७) मोने संजय, सॉरी रॉंग नंबर, प्रिझम कैसेट कंपनी, मुंबई.

१८) मोरे सदानंद, उजळल्या दिशा, मनोरंजन नाट्य संस्था, पुणे.

१९) यज्ञोपवीत किरण, मळभ, समन्वय नाट्य संस्था, पुणे.

२०) रविंद्र लता, सिगारेटस्, ललित नाट्य, मुंबई.

२१) लवंगारे जनार्दन, लक्ष्मी प्रॉडक्शन, मुंबई.

२२) शिरवाडकर वि.वी. नटसम्राट, दि गोवा हिंदू असोसिएशन, गोवा

२३) शिंदे केदार, लोच्या झाला रे, श्री चिंतामणी नाट्य संस्था, मुंबई.

२४) सबनीस वसंत, कार्टी काळजात घुसली, कला वैभव नाट्य संस्था, मुंबई.

२५) सराफ शार्दूल, रात्रं दिन आम्हां, साई किरण प्रॉडक्शन, पुणे.

२६) साठे मकरंद, चौक, अतुल पेठे प्रोडक्शन, मुंबई.

८. संदर्भग्रंथ

१) माळी वीणा, नाटकांचा आकृतीबंध.

२) नाईक राजीव, नां नाटकातला, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

३) आमची श्री वाणी, १९९९/२०००

४) देशमुख रमेश, १९७० नंतरच्या मराठी प्रायोगिक नाटकांचा अभ्यास, पुणे.

५) भगत दत्ता, मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती, २०१९.

५) देशपांडे वि. भा., मराठी नाटक आणि रंगभूमी, विलास प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१७.

६) कुलकर्णी अ. वा., नाटक व रंगभूमी काही विचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

७) डहाके वसंत आबाजी, मराठी नाटक आणि विसावे शतक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

८) दुबे चंदुलाल, हिंदी आणि मराठी व्यावसायिक रंगभूमीचे जनकः विष्णूदास भावे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

९) शिंदे विश्वनाथ, शोधयात्रा रंगभूमीची, पद्मगंधा प्रकाशन, मुंबई.

१०) साठे मकरंद, मराठी रंगभूमीच्या तीस रात्री, खंड दुसरा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

११) ब्रह्मे मो. द., नटसम्राटः एक अभ्यास, व्हीनस प्रकाशन, पुणे.

टीपः- संशोधनादरम्यान प्रकरणात आणि नाटकांच्या उपलब्धतेनुसार काही बदल होऊ शकतात.

संशोधक

सत्यवान बबन दाढे

कै. शंकरराव बाजीराव पाटील,
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
अनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. दुष्यंत मनोहर कटारे

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,
बाभळगांव, ता. जि. लातूर